**दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात.**
**नियमित दिवाणी मुकदमा नं. ५९/२०२२**
**निशाणी क्र. ३४ खालील आदेश**

(महादेव वि. वसंत व इतर )

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. २६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला ११ महिन्यांचा विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, सदर दाव्याचे काम चालू असताना प्रतिवादी क्र. २६ कुंडलिक नारायण जाधव हे दि. २२.०२.२०२२ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. २६ यांना जवळचे वारस म्हणून पत्नी, मुलगा, मुलगी असे वारस आहेत. सदर वारस अभिलेखावर घेण्यास ११ महिन्यांचा विलंब झाला आहे. वादीने जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सदर विलंब माफ होणे आवश्यक आहे. तरी मयत प्रतिवादी क्र. २६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जास प्रतिवादी क्र. ९ ते ११ तर्फे म्हणणे देऊन त्यांनी असे कथन केले की, अर्जातील मजकुर खोटा आहे. विलंब ११ महिन्याचा नसून १६ महिन्यांचा आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अभिलेख तपासून पाहिले असता वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. २६ हे दि. २२/०२/२०२२ रोजी मयत झाले आहेत. वादीने नि. ३१ कडे मयत प्रतिवादी क्र. २६ यांचा मयत दाखला हजर केला आहे. सदरकामी वारस ९० दिवसांचे आत अभिलेखावर घेणे जरुरी होते, परंतु वादीचे वारसांना वेळेत वारस अभिलेखावर आणता आलेले नाही. त्यामुळे वारस अभिलेखावर

घेण्यास विलंब झालेला आहे. सदर कथनांच्या पुष्टयर्थ वादीने निशाणी ३५ येथे शपथपत्र दाखल केले आहे. तरी देखील मुदतीमध्ये वारस रेकॉर्डवर न घेतल्याची बाब स्पष्ट होते. वादींनी अर्जामध्ये नमूद केलेले कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता, वादाचा विषय गुणदोषावर निर्गत होणे आवश्यक आहे. जर प्रतिवादीचे वारसांना अभिलेखावर घेण्याची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही, तर ते त्यांच्या न्यायहक्कापासून वंचित राहू शकतात. त्याहीपेक्षा तुर्तास दावा अत्यंत प्राथमिक स्वरुपात आहे. ही बाब निश्चितपणे जाणवते की, वादीच्या कृत्यामुळे प्रतिवादीस विनाकारण विलंब आणि मानसिक त्रास सहन करावा लागला, परंतु सदरची बाब ही वादीवर आर्थिक भूर्दंड लादल्यानंतर काहीअंशी कमी करता येवू शकते. याउलट, अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढून आणखी जटील बनू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

## आदेश

१. अर्ज (नि. क्र. ३४) वादीने रक्कम रु. १,०००/– (रु. एक हजार मात्र) प्रतिवादी यांना दंड देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. २६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2023.10.07 13:47:39 +0530

सांगोला
दिनांक – ०७/१०/२०२३.

(श्री. संजय मो. घुगे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 07/10/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 07/10/2023 |